REGISTERED No. B 3434

जाहिरातींचें दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ३ एप्रिल, १९४० | अंक १४

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या मार्गानें केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जे इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिति

### एकहि आगबोट बुडाली नाहीं

२४ ते ३१ मार्च, १९४० ह्या आठवड्यांत ब्रिटिश अगर दोस्त राष्ट्रांची एकहि आगबोट जर्मनीनें बुडवली नाहीं. ज्या आठवड्यांत त्यांची आगबोट बुडाली नाहीं, असा युद्धास प्रारंभ झाल्यापासूनचा हा पहिलाच आठवडा होय.

### हिंद–जपान व्यापार

हिंद–जपान व्यापारी कराराची मुदत ३१ मार्च रोजीं संपली. परंतु त्यापूर्वी नवीन करार पुरा करतां येणें अशक्य झाल्याकारणानें त्याबाबत तात्पुरती व्यवस्था करण्यांत आली आहे.

### सुटींतील प्रवासी

ईस्टरच्या सुट्टीचा फायदा घेण्यासाठी लंडनमधील लोक बाहेर पडतात. गेल्या गुडफायडेच्या दिवशीं ब्रिटिश रेल्वेजवर उतारूंची गर्दी झाली, ती १९३९ च्या गुडफायडेच्या दिवशीं झालेल्या गर्दीपेक्षा मोठी होती. १९३८ च्या ईस्टरपेक्षा तर ती दुपटीपेक्षा अधिक होती.

### साकंद येथें शेतकी कॉलेज

सिंध प्रांतामध्यें साकंद येथें ता. १ एप्रिलपासून त्या प्रांताचें शेतकी कॉलेज सुरू होणार आहे.

### फिनलंडचें नुकसान

रशिया आणि फिनलंड ह्यांचेमधील युद्धांत १५ हजार फिनिश लोक मृत्युमुखीं पडले त्यामुळें ९ हजार स्त्रियांस वैधव्य प्राप्त झालें आणि २५ हजार मुलें पोरकीं झालीं. रशियन बॉंब ५ हजार घरांच्या नाशास कारणीभूत झाले. त्यांतील एकतृतीयांश घरें पार जमीनदोस्त झालीं असून ५ लक्ष लोकांचा आसरा नाहींसा झाला आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १२ आ. व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १२ आ. इतका पडला.

### जपानी वकिलाची नेमणूक

हिंदुस्थानांत आपला व्यापार वाढविण्यासाठी जपानी सरकारनें कराची येथें आपला एक वकील नेमण्याचें ठरविलें आहे. मुंबई आणि कलकत्ता येथें जपानी सरकारचे वकील आहेतच. मद्रास येथेंहि एक वकील नेमण्याचें जपानी सरकारचें घाटत आहे.

### ओरिएंटल विमा कं. लि.

ओरिएंटल विमा कंपनीनें गेल्या वर्षी ७ कोटि, ७२ लक्ष रुपयांचे ३९,९९५ विमे उतरविले.

### पुणें इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

गेल्या वर्षी वरील कंपनीस ४ लक्ष, ९४३ हजार रुपये निव्वळ नफा झाला. विजेचे दर कमी केल्यामुळें विजेचा खप वाढला तरी उत्पन्न ९२ हजारांनीं घटलें. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळालें.

### वैमानिक वाहतुकीची सुरक्षितता

ग्रेटब्रिटनमध्यें १९३८ सालीं एकूण ९३ लक्ष उतारूंनीं प्रवास केला. त्या सर्वांचा मिळून ५ कोटि, ९४ लक्ष मैल प्रवास झाला. ४७ लक्ष मैलांच्या प्रवासामागें एका उतारूचें अपघातांत मरण, असें प्रमाण पडलें. एकूण अपघातांची संख्या केवळ चार भरली.

### म्हैसूर संस्थानांत विजेचा खप

म्हैसूर संस्थानांत विजेचा दरमाणशीं खप ३० युनिट्स आहे. विजेचा उत्पादन खर्च प्रत्येक युनिटास सरासरीनें २·८ पै इतका येतो.

### १४ कोटि रुपये नफा आणि २३% डिव्हिडंड

इंपीरिअल टोबॅको कंपनीला गेल्या वर्षी सुमारें १४ कोटि रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांस करमाफ २३% डिव्हिडंड मिळालें.

### मोटार ड्रायव्हरांची निवड

बी. ई. एस. टी. कंपनी, ज्या ड्रायव्हरांजवळ निदान ३ वर्षे मोटार वाहतुकीचा परवाना आहे अशांतूनच आपल्या ड्रायव्हरांची निवड करते. ह्या अर्जदारांचें वय ३५ चे आंत आणि उंची ५½ फुटांचे वर असावी लागते आणि त्यांची वैद्यकीय तपासणी घेण्यांत येते.

### सैनिकांचीं मतें

ऑस्ट्रेलियाच्या पार्लमेंटची निवडणूक चालू वर्षअखेर व्हावयाची आहे, त्यावेळीं प्रत्यक्ष आघाडीवर लढण्यासाठी गेलेल्या संदर्कांतील सैनिकांसहि मत देण्यास संधी मिळेल.

### दर माणशीं ४० गॅलन पाणी

अहमदाबादमधील पाण्याचा दर माणशीं पुरवठा ४० गॅलन इतका आहे.

### कुटुंबांतील चौघे परीक्षेस बसणार

कानपूर म्युनिसिपल बोर्डांतील ५२ वर्षांचा एक कारकून, त्याची पत्नी आणि त्याच्या दोन मुली हीं सर्व एकाच वेळीं यू. पी. बोर्ड ऑफ हायस्कूल अँड इंटर मीजिएट परीक्षेस बसणार आहेत.

### मुदती हुंड्यांवरील ड्यूटी

मुदती हुंड्यांवरील ड्यूटी सरकारनें दर हजारीं २ आणे केल्याचें मागेंच जाहीर झालें आहे. ह्या हुंड्या ब्रिटिश हिंदुस्थानांत काढलेल्या असल्या पाहिजेत आणि ब्रिटिश हिंदुस्थानांत त्यांची रक्कम देणें असली पाहिजे. हुंड्यांची मुदत १ वर्षापेक्षा दीर्घ असतां कामा नये. हा कमी केलेला दर १२ जानेवारी, १९४० पासून अंमलांत आला.

### पोस्टाचे दर चालू रहाण्यासाठी ऑर्डिनन्स

पोस्टाचे दर फिनॅन्स बिलांत समाविष्ट आहेत. हें बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें मंजूर केलें. परंतु कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें तें ३१ मार्चपूर्वी पास होऊं शकलें नाहीं. त्यामुळें ३१ मार्च रोजीं पोस्टाचे चालू दर रद्द व्हावयाचे त्यांस कौन्सिल ऑफ स्टेटची मंजुरी मिळेपर्यंत ते चालू रहावे ह्यासाठीं त्यासंबंधांत एक ऑर्डिनन्स काढण्यांत आला आहे.

### सिंधमध्यें कपाशीची लागवड

कपाशीचा बाजारभाव वाढला असल्याकारणानें सिंधमध्यें सक्करच्या धरणाखालील जमिनींत कपाशीची लागवड वाढण्याचा रंग दिसतो. सिंधमध्यें गेल्या वर्षी ८ लक्ष, २५ हजार एकरांत आणि त्यापूर्वीच्या वर्षी ८ लक्ष, ९४३ हजार एकरांत कपाशीची लागवड झालेली होती.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १५८ |
| २ वऱ्हाडांतील सहकारी बँका | १५९ |
| ३ हुंडणावळीचें राष्ट्रीय नियंत्रण ... | १६० |
| ४ ट्रेझरी बिलें ... | १६० |
| ५ स्फुट विचार ... | १६१ |
| साखरेवरील एक्साइज पट्टी—हिंदी रेशमाचे धंद्यास संरक्षण—नोकरीवरील करास नामंजुरी—जमीनदारी पद्धति बंद करणार!—जमीन गहाणाच्या बँकांची परिस्थिति | |
| ६ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा ... | १६३ |
| ७ अमेरिकेचें युद्धविषयक धोरण ... | १६६ |
| ८ निवडक बाजारभाव | १६८ |

# अर्थ

बुधवार, ता. ३ एप्रिल, १९४०

## वऱ्हाडांतील सहकारी बँका

मध्यप्रांत आणि विशेषेकरून वऱ्हाड येथील सहकारी मध्यवर्ती बँकांच्या व पतपेढ्यांच्या दुःस्थितीचा प्रश्न भिजत पडला होता, तो सुटण्याच्या मार्गास लागला आहे. प्रांतिक कायदे मंडळाचे व अंमलबजावणीचे सर्व अधिकार सध्या गव्हर्नरांच्या हातांत असून त्यांनीं मध्यप्रांतीय सहकारी कायद्याची दुरुस्ती करण्याचें ठरवलें आहे. वऱ्हाडमधील सहकारी चळवळ तूर्त स्थगित झाल्यासारखी आहे. तिच्यामध्यें चैतन्य उत्पन्न करून बँकांचे व्यवहार पुन्हां चालू होण्यास उत्तेजन देणें हा प्रस्तुत दुरुस्तीचा उद्देश आहे. ही नवीन योजना ठेवीदारांस मान्य होईल कीं नाहीं ह्याचा संशय असला तरी वऱ्हाडमधली सहकारी चळवळीची सध्याची कोंडी फुटण्यास तिचें सहाय होईल त्यांत शंका नाहीं. असें म्हणण्याचें कारण हें आहे कीं वऱ्हाडांतील सहकारी बँकांच्या परिस्थितीच्या व भवितव्याच्या प्रश्नाची चर्चा दीर्घ काळपर्यंत चालली असून तीमध्यें तीव्र मतभेद व्यक्त झाले आहेत. कॉंग्रेसच्या अधिकारांतलें प्रधानमंडळ सत्तारूढ होतें तेव्हां बँका व त्यांचे ठेवीदार ह्यांच्या प्रतिनिधींनीं आपल्या हितसंबंधांचें योग्य रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे असा आग्रह धरला होता. ह्या सबंद प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कमिटीनें बँकांच्या पुनर्घटनेची व ठेवीदारांच्या हिताचे संरक्षणाची योजना सुचवली होती, तीमध्यें प्रांतिक सरकारावर पैशाची मदत देण्याची बरीच मोठी जबाबदारी टाकण्यांत आली होती आणि सरकार ती उचलण्यास तयार नव्हतें. हें धोरण आतांहि सरकारनें बदललेलें नाहीं. वादाचा मुख्य प्रश्न आहे तो, बँकांच्या ठेवीदारांस आपला सर्व पैसा, हप्तेबंदीनें कां होईना, परत मिळणें इष्ट व शक्य आहे व त्यांनीं आपल्या येण्याचा बराच मोठा हिस्सा गमावण्यास तयार झाल्यावांचून पुनर्घटनेची कोणतीहि विधायक योजना व्यवहार्य नाहीं, ह्या संबंधाच्या निकालाविषयींचा आहे.

ह्या वादाचें रहस्य लक्षांत येण्यास त्याच्या दोन्ही बाजू स्पष्ट होणें आवश्यक आहे. बँकांच्या ठेवीदारांचें म्हणणें असें आहे कीं सहकारी चळवळीस सरकारचा पाठिंबा असून तिच्यावर त्याचें नियंत्रण असल्यानें आपल्या पैशाच्या सुरक्षितपणाविषयीं निर्धास्तपणा वाटून तो आपण बँकांत ठेवला. सहकारी पतपेढ्यांचीं कर्जें थकल्यामुळें किंवा बुडाल्यामुळें बँकांस होणारा तोटा आपणांवर लादणें न्यायाचें नाहीं. आर्थिक आपत्तीमुळें येणाऱ्या ह्या नुकसानीचा वांटा सरकारनें सोसला पाहिजे, निदान बँकांच्या देण्याची व्यवस्था किमान नुकसानीनें होईल अशी तजवीज त्यानीं केली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे आणि सरकारावर विशेष बोजा न पडतां ह्या बाबतींत व्यावहारिक योजना अंमलांत येणें शक्य आहे असें त्यांचें म्हणणें आहे. सहकारी चळवळ चालू रहावी अशी सर्वांची इच्छा आहे, पण तिचा यशस्वीपणा तींत पैसा घालणाऱ्या जनतेच्या विश्वासावर अवलंबून आहे आणि ठेवीदारांचा पैसा सुरक्षित नसतो असा लोकांचा एकदां ग्रह झाला म्हणजे सहकारी संस्थांची लौकिक पत नाहींशी होऊन सर्व भांडवल सरकारासच पुरवावें लागेल; असा मूलग्राही युक्तिवाद करण्यांत येत आहे. त्यावर आधारलेली एक योजनाहि सरकारपुढें मांडण्यांत आलेली आहे.

ह्याच्या विरुद्ध बाजूचें असें म्हणणें आहे कीं सहकारी चळवळीस सरकारचा पाठिंबा आहे, ह्याचा असा अर्थ नाहीं कीं कोणत्याहि परिस्थितींत मध्यवर्ती बँकांचें किंवा पेढ्यांचें नुकसान होऊं लागल्यास तें सरकारी तिजोरीनें सोसावें. कर्जें देण्याची व तीं वसूल करण्याची जबाबदारी मुख्यत्वें करून बँका व पेढ्या ह्यांची आहे आणि सबंद समाजास भोवणारी आर्थिक मंदीसारखी आपत्ति आली आणि शेतकऱ्यांच्या पतपेढ्यांस कर्जफेड करतां आली नाहीं तर सर्वांबरोबर बँकांनीं व त्यांच्या ठेवीदारांनीं येणारें नुकसान सोसण्यास तयार झाल्यावांचून गत्यंतर नाहीं. ठेवीदार आणि बँका ह्यांचे दरम्यान अशी तडजोडीची व्यवस्था न होईल तर बँका गुंडाळल्या जाऊन ठेवीदार सपशेल बुडण्याची भीति आहे. पतपेढ्यांच्या सभासदांस कर्जफेडीची शक्ति नाहीं आणि त्यांच्या जमिनी बँकांच्या ताब्यांत आल्या आहेत. अनेक पेढ्या बंद पडल्या आहेत. अशा स्थितींत सहकारी चळवळीची पुनर्घटना होणें इष्ट असून बँका व त्यांचे ठेवदार ह्यांनीं झीज सोसणें आवश्यक झालें आहे. ह्या पुनर्घटनेच्या कामीं सरकार सवलती व द्रव्यसहायहि देईल, पण ह्याच्याहि पलीकडे त्यानें जावें अशी अपेक्षा बँकांनीं व ठेवीदारांनीं करणें सयुक्तिक व लोकहिताचें नाहीं.

मध्यप्रांतीय सरकाराची भूमिका व योजना खालीं दिल्याप्रमाणें आहे. वऱ्हाडांतील सहकारी संस्थांची स्थिति बिघडली आहे, तिची नैतिक किंवा सांपत्तिक जबाबदारी सरकार यत्किंचितहि घेण्यास तयार नाहीं. तथापि, प्रांतांतली सहकारी चळवळ व शेतकरीवर्ग ह्यांच्या हिताविषयीं वाटत असलेल्या सहानुभूतीनें प्रेरित होऊन सरकार बँकांस सहाय देण्यास उत्सुक आहे. सेंट्रल बँकांचीं जीं कर्जें वसूल व्हावयाचीं आहेत, तीं तडजोडीनें कर्जदारांच्या सांपत्तिक सामर्थ्याच्या मर्यादेपर्यंत कमी करण्यांत येतील आणि त्यांच्या फेडीची वीस वर्षांची हप्तेबंदी होत असेल तर त्या कमी झालेल्या देणें रकमेवर ३. टक्के व्याजाची हमी सरकार स्वीकारील. ह्या व्यवस्थेमुळें बँकांस नुकसान येऊन त्या चालवण्याच्या मार्गांत अडचणी येतील त्या दूर व्हाव्या म्हणून निदान तीन वर्षेपर्यंत दर वर्षी एक लक्ष रुपयेपर्यंत खर्चासाठीं सहाय देण्याची तयारी सरकारनें दर्शवली आहे. नवीन व्यवस्थेच्या अंमलबजावणीस मदत म्हणून देखरेखीसाठी अधिकाऱ्यांची तरतू-

वृद्धि सरकार करील. बँकांच्या व्यवस्थापक मंडळांचीहि पुनर्घटना करणें आवश्यक होईल आणि त्या कामीं सरकार जरूर ती योजना अमलांत आणील. सहकारी बँका व पेढ्या ह्यांच्या येणेकऱ्यांनीं आपल्या येण्यांबाबत तडजोड करावी म्हणून आवश्यक असलेली तरतूद नवीन कायद्यांत करण्यांत आली आहे. बँकांच्या ठेवीदारांनीं बहुमतानें येणें असलेली रकम कमी करून घेण्यास त्या संस्थांशीं तडजोड केल्यास तीस संमती रजिस्ट्रारकडून मिळेल आणि ह्या निर्णयाविषयीं कोणत्याहि कोर्टांत दावा चालणार नाहीं. ह्या रीतीचें सरकारी योजनेचें स्वरूप असून ती वऱ्हाडांतील सहकारी चळवळीच्या परिस्थितींत किमान नुकसानीची व कमाल व्यवहार्यतेची आहे किंवा नाहीं, हाच येथें महत्त्वाचा प्रश्न आहे सहकारी संस्थांच्या स्थैर्याची व यशस्वी कारभाराची ही बाब आहे.

## हुंडणावळीचें राष्ट्रीय नियंत्रण

आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांत आपल्या देण्यापेक्षा येणें अधिक असावें ह्याविषयीं प्रत्येक राष्ट्र धडपड करीत आहे. युद्धाची किंवा स्वसंरक्षणाची तयारी जय्यत ठेवावयाची म्हणजे लढाऊ माल बाहेरून आणणें प्राप्त होतें आणि त्यासाठी होणाऱ्या देण्याची व्यवस्था करण्यास परराष्ट्रीय हुंड्यांची आवश्यकता असते. ह्यासाठी युद्धोपयोगी व राष्ट्रीय महत्त्वाच्या मालाच्या आयातीस अग्रस्थान द्यावें लागून सरकारास व्यापार व हुंडणावळ ह्यांचें नियंत्रण करावें लागतें. ज्या देशाकडून मालाची खरेदी व्हावयाची त्यावरील हुंड्या मिळवण्याचें आणि त्यांची योग्य वांटणी करण्याचें काम राष्ट्रीय सरकार करतें. परराष्ट्रीय देणींघेणीं आपल्यामार्फत व्हावी असा आग्रह तें धरतें आणि बिन-सरकारी व्यापारी व्यवहार सरकारी नियंत्रणानें चालतात. युद्ध परिस्थितींत आंतरराष्ट्रीय व्यवहारांत उधारी चालू देण्याची सोय नसते. इंग्लंडला अमेरिकेंतून माल खरेदी करावा लागत आहे, त्याची किंमत त्या राष्ट्रावरील हुंड्या मिळवून त्या मार्गानें दिली जाते. शिवाय, हुंडणावळीचे दर निश्चित असत नाहींत, आणि जरूर त्या राष्ट्रावरील हुंड्या खुल्या बाजारांत मिळण्यास अडचण पडते. ह्या परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांच्या व्यापारांत निघणाऱ्या व लागणाऱ्या परराष्ट्रीय हुंड्यांचा पुरवठा नियंत्रित करून त्याचा युद्धकार्यास आवेकाधिक उपयोग होईल अशी व्यवस्था ब्रिटिश सरकारनें चालवली आहे. ज्यांचीं चलनें ब्रिटिश पौंडावर आधारलेलीं आहेत आणि ज्यांच्या चलनांची पौंडांतली किंमत निश्चित व अधिकृत आहे अशा देशांकडून यावयाच्या पैशाची विशेष अडचण भासत नाहीं. ह्या क्षेत्राबाहेरील देशांकडील येण्याची भरपाई करून घेण्याचा प्रश्न अवघड असतो. ज्या देशांच्या मालाचें देणें इंग्लंडला देणें असतें त्यांवर काढलेल्या हुंड्या आपल्या देणेंदारांकडून आपणांस मिळाव्या असें त्या राष्ट्रास वाटतें आणि त्या बाबतींत ब्रिटिश सरकारनें व्यवस्था केली आहे. उदाहरणार्थ, हिंदी मालाच्या निर्गतीचे पैसे वर निर्दिष्ट केलेल्या पौंडाच्या क्षेत्राबाहेरील देशांची अमेरिकन डॉलर्स, डच गिल्डर्स, बेल्जम व स्विस फ्रँक्स ह्या चलनांतल्या हुंड्या मिळतील तेथें व तशा खरेदी करून त्यांच्या स्वरूपांत पुरवावें अशी तजवीज हिंदुस्थान सरकार करील असा अंदाज "एकॉनामिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें केला आहे. हिन्दी निर्गत व्यापारांत काढण्यांत येणाऱ्या हुंड्यांचा पूर्ण उपयोग ब्रिटिश सरकारास आपलें हुंडणावळीचें धोरण यशस्वी करण्यांत व परराष्ट्रीय देणें सोयीनें भागवण्यांत व्हावा हा सदरहू व्यवस्थेचा उद्देश आहे. पौंडाच्या क्षेत्राबाहेरील राष्ट्रांतील व्यापाऱ्यांस हिन्दी मालाबद्दल रुपयांत देणें द्यावयाचें असेल तर त्यांनीं डॉलर्स, गिल्डर्स, इत्यादि चलनांच्या हुंड्या मिळवून त्या आपल्या बँकेस दिल्या पाहिजेत, म्हणजे त्यांचे देणें भागेल अशी ही योजना आहे. हिन्दी निर्गत व्यापार आणि हुंडणावळ ह्यांचें सहाय ब्रिटिश राष्ट्रास कसें होत आहे हें त्या व्यवस्थेवरून दिसून येईल.

## मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांचीं ट्रेझरी बिलें

मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांचीं ट्रेझरी बिलें विकण्याचें काम रिझर्व्ह बँक करते. मध्यवर्ती सरकारच्या ट्रेझरी बिलांवर जानेवारी ते एप्रिल, १९३९ ह्या मुदतींत व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. २¾% पडला, तो पुढें उतरत उतरत जाऊन जुलै आणि ऑगस्टमध्यें 1% वर आला. सप्टेंबर आणि आक्टोबर मध्यें तो पुन: २¾% वर गेला आणि वर्ष अखेर २% पर्यंत उतरला. १९३९ मध्यें मध्यवर्ती सरकारचीं एकूण ११९ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकण्यांत आलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. २ रु. ० आ. १ पै इतका पडला. १९३८ सालीं एकूण ८८½ कोटि रुपयांच्या बिलांची विक्री झाली होती व त्यांवरील व्याजाचा सरासरी दर १ रु. ४ आ. १० पै इतका होता. हीं बिलें त्यांच्या मूळ व्याजाच्या दरापेक्षा जरा थोड्या अधिक दरानें रीडिस्कौंट करण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँक करते.

१९३८ अखेर मध्यप्रांत व वऱ्हाड, आसाम, मद्रास आणि संयुक्त प्रांत ह्या प्रांतांचींच सरकारें ट्रेझरी बिलांचे स्वरूपांत अल्प मुदतीचीं कर्जें काढीत असत. १९३९ सालीं बंगाल आणि पंजाब ह्या प्रांतांनींहि ट्रेझरी बिलें विकण्यास प्रारंभ केला. सर्व प्रांतांनीं मिळून १९३९ सालीं ११ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें. विकलीं, त्यांवर त्यांस द. सा. द. शे. २ रु. ९ आ. ४ पै प्रमाणें व्याज पडलें. म्हणजे, मध्यवर्ती सरकारापेक्षा प्रांतिक सरकारांस द. सा. द. शे. ९ पै ३ आ. अधिक व्याज भरावें लागलें. १९३८ सालीं प्रांतिक सरकारांनीं द. सा. द. शे. सरासरीनें १ रु १० आ. २ पै व्याजानें ४३½ कोटींचीं ट्रेझरी बिलें विकलीं होतीं. मध्यवर्ती सरकारच्या ट्रेझरी बिलांस जशी मागणी येते, तशी प्रांतिक सरकारांच्या बिलांस येत नाहीं. त्यामुळें त्यांस व्याजाचा दर अधिक पडतो. खालील तक्त्यांत वेगवेगळ्या प्रांतिक सरकारांनीं वेळोवेळ घेतलेल्या ट्रेझरी बिलांचे स्वरूपांतील कर्जांची माहिती दिली आहे-

### १९३९ सालांतील प्रांतिक सरकारांचीं ट्रेझरी बिलें

| अखेरचा आठवडा | प्रांतिक सरकार | दर्शनी किंमत (लक्ष रु.) | व्याजाचा सरासरी दर (द. सा. द. शे.) रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|
| २ फेब्रु. | मध्यप्रांत | २५ | २ | १२ | ० |
| ३ मार्च | आसाम | २५ | २ | १२ | ० |
| २४ मार्च | आसाम | १५ | २ | ८ | ० |
| ३१ मार्च | मध्यप्रांत | ३०. | २ | ९ | १ |
| २८ एप्रिल | पंजाब | ९० | २ | ८ | १० |
| ७ जुलै | मध्यप्रांत | ३० | २ | ० | ० |
| ११ ऑगस्ट | बंगाल | ३० | १ | १४ | ९ |
| ११ ऑगस्ट | मद्रास | ७५ | १ | १ | ११ |
| १ सप्टें. | मध्यप्रांत | ५५ | ३ | ८ | ० |
| ८ सप्टें. | बंगाल | ५० | ३ | ८ | ० |
| २९ सप्टें. | संयुक्तप्रांत | १०० | २ | १५ | १० |
| २९ सप्टें. | आसाम | ६० | ३ | ० | ० |
| २७ ऑक्टो. | संयुक्तप्रांत | ५० | ३ | ० | ० |
| २७ ऑक्टो. | मद्रास | १०० | २ | १५ | १० |
| ३ नोव्हें. | मद्रास | ७५ | २ | ८ | ० |
| ३ नोव्हें. | मध्यप्रांत | ५० | २ | ७ | १ |
| १७ नोव्हें. | मद्रास | ७५ | २ | ४ | ० |
| १ डिसें. | संयुक्तप्रांत | ५० | २ | ५ | ० |
| २२ डिसें. | मद्रास | १०० | २ | २ | १० |

# स्फुट विचार

## साखरेवरील एक्साइज पट्टी

हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या साखरेवर प्रत्येक हंड्रेडवेटास २ रुपये एक्साइज ड्यूटी होती, ती फिनॅन्स बिलानें ३ रुपये करण्यांत आली. ही वाढलेली पट्टी १ मार्च १९४० नंतर तयार झालेल्या साखरेवरच घेण्यांत यावी; १ मार्चपूर्वी उत्पादन झालेल्या साखरेवर पूर्वीचीच २ रुपयांची पट्टी असावी अशी फिनॅन्स बिलास एक उपसूचना मि. रॅमूसे स्कॉट ह्यांनीं असेंब्लीमध्यें आणली आणि ती फडनविसांनीं मान्य केली. हिंदुस्थानांत साखरेचे कारखाने निघण्यापूर्वी आयात साखरेवरील जकातीचे सरकारास सालिना सुमारें ८ कोटि रुपये मिळत असत; येत्या वर्षी एकट्या साखरेवरील एक्साइज पट्टीचेंच उत्पन्न ६ ते ६½ कोटि रुपये होईल, अशी अपेक्षा आहे. २९ फेब्रुवारी रोजीं हिंदी साखर कारखान्यांत सुमारें ३½ लक्ष टन साखर शिल्लक होती. त्यांवर प्रत्येक हंड्रेडवेटास १ रुपयाप्रमाणें एक्साइजमध्यें सूट दिली, म्हणजे सरकारास सुमारें ७० लक्ष रुपये मिळतील. बजेट प्रसिद्ध झाल्यानंतर साखरेची किंमत चढलेली नाहीं. उसाच्या दरांत प्रत्येक हंड्रेडवेटास ११ आणे प्रमाणें झालेल्या घटीचा फायदा १ मार्चनंतर तयार झालेल्या साखरेसच फक्त झाला असल्याकारणानें, कारखान्यांस वास्तविक ५ आणेच जादा द्यावे लागणार आहेत. त्यापूर्वी तयार झालेल्या साखरेवर मात्र जादा पट्टीचा म्हणजे सबंद रुपयाचा बोजा बसत आहे. वरील प्रकारचें आपल्या उपसूचनेचें समर्थन मि. स्कॉट ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. एक्साइज पट्टी ज्या दिवशीं जाहीर करण्यांत येते, त्या दिवसापासूनच ती लागू केली जाते, असा रिवाज आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणांत हिंदी साखर कारखान्यांस खास सवलत म्हणून फडनवीस, सर जेरेमी रेसमन, ह्यांनीं साखरेवरील एक्साइजची नवीन पट्टी लागू करण्याची तारीख १ एप्रिलपर्यंत पुढें ढकलण्यास संमति दिली. २९ फेब्रुवारी पूर्वीच्या आणि नंतरच्या उसाच्या किंमतीमध्यें पडलेली मोठी तफावत आणि अंदाजापेक्षा फार अधिक असलेला साखर कारखान्यांजवळील २९ फेब्रुवारी रोजींचा साखरेचा साठा, ह्या दोन कारणांस्तव फडनवीस उपसूचना मान्य करण्यास प्रवृत्त झाले. ह्या दुरुस्तीसह फिनॅन्स बिल असेंब्लींत मंजूर झालें, त्यामुळें सरकारचें ७० लक्ष रुपये उत्पन्न बुडालें आणि साखर कारखान्यांवरील तेवढा बोजा कमी झाला.

---

## हिंदी रेशमाचे धंद्यास संरक्षण

परदेशांतून आयात होत असलेल्या कच्च्या रेशमाची स्थानिक धंद्याशीं अनिष्ट स्पर्धा होत असल्याची तक्रार हिंदुस्थान सरकारकडे १९३२ चे सुमारास करण्यांत आली, तिचा इष्ट तो परिणाम होऊन हिंदी रेशमाच्या धंद्याच्या परिस्थितीची चौकशी करण्याचें काम हिंदुस्थान सरकारनें टॅरिफ बोर्डाकडे सोंपविलें. टॅरिफ बोर्डानें मे, १९३३ अखेर आपलें काम संपवून तयार आणि कच्चा दोन्ही प्रकारच्या परदेशी रेशमावर संरक्षक जकाती बसविण्यांत याव्या अशी शिफारस केली. सरकारनें मूळ शिफारशींत फेरबदल करून १९३४ सालीं ५ वर्षे मुदतीचें संरक्षण देणारा एक कायदा विधिमंडळांत पास करून घेतला. ही मुदत ३१ मार्च, १९४० रोजीं संपली. त्यानंतर द्यावयाच्या संरक्षणाचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या टॅरिफ बोर्डाचा रिपोर्ट १९३८ सालींच सरकारास सादर करण्यांत आला होता, तरी त्यासंबंधीं सरकारचें धोरण निश्चित होण्यास दोन वर्षांचा कालावधि पुरला नाहीं आणि सध्याचें संरक्षण आणखी दोन वर्षे, म्हणजे १ एप्रिल, १९४२ पर्यंत चालू रहावें, असें सरकारनें ठरवून त्याप्रमाणें असेंब्लींत बिल मांडलें. टॅरिफ बोर्डाचा रिपोर्ट मात्र आतां प्रसिद्ध करण्यांत आला आहे. बोर्डाच्या बहुसंख्य सभासदांनीं म्हणजे मि. फाझल रहिमतुल्ला आणि मि. एन. जे. हाउटन ह्यांनीं रेशमाचे धंद्यास आणखी पांच वर्षे संरक्षण चालू ठेवावें असें सुचविलें आहे, तर मि. एन. एन. अंक्लेसारिया ह्यांनीं सध्याच्या जकाती उतरविणें इष्ट आहे असें आपलें मत व्यक्त केलें आहे. "युद्धपरिस्थितीमुळें रेशमाच्या किंमतींत पुरेशी वाढ झालेली आहे आणि आजच्या अनिश्चित परिस्थितीमध्यें दीर्घकालीन धोरण आखणें कठीण झालें आहे" ह्या सबबीवर सरकारनें टॅरिफ बोर्डाचा रिपोर्ट बाजूस सारल्यासारखें केलें आहे.

---

## नोकरीवरील करास नामंजुरी

संयुक्त प्रांताच्या विधिमंडळानें गेल्या वर्षी नोकरीवर कर बसविणारें एक बिल मंजूर केलें होतें परंतु प्रांतिक गव्हर्नरानें त्यास मंजुरी न देतां गव्हर्नर जनरलच्या विचारासाठी तें राखून ठेवलें होतें. लष्करी खात्यांतील अधिकारी वगळून बाकी सर्व नोकरांस हा कर द्यावा लागेल, अशी त्या बिलांत तरतूद होती. गव्हर्नर, सनदी नोकर, मंत्रि, सरकारी व खासगी नोकर, ह्या सर्वांवर प्रस्तुत कराचा बोजा बसणार होता. विशेषतः सनदी नोकरांत ह्या बिलानें खळबळ उडवून दिली होती. हा कर म्हणजे प्राप्तीवरील कराचाच एक प्रकार आहे असा त्यावर आक्षेप होता, परंतु "तो प्राप्तीवरील कर नसून, प्राप्ती मिळणाऱ्या मनुष्यावरील कर आहे" असें त्याचें समर्थन संयुक्त प्रांत सरकारनें केलें. ह्या कराचे योगानें प्रांतिक सरकारच्या अधिकाराचें अतिक्रमण होतें किंवा काय, असा प्रश्न उपस्थित झाला. प्राप्तीवरील कर आणि नोकरीवरील कर ह्यांमधील मर्यादा अनिश्चित स्वरूपाची आहे. ह्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटानें हिंदी राज्यघटनेच्या १९३५ च्या कायद्यांत दुरुस्ती केली आणि त्या अन्वयें, धंद्यांवरील कर विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे गेल्यास ते मध्यवर्ती सरकारच्या सीमेंत पडतात, असें ठरलें. गव्हर्नर जनरलनें त्याचा आधार घेऊन गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या ७६ व्या कलमानुसार संयुक्त प्रांताच्या नोकरीवरील कराविषयक बिलास संमति देण्याचें नाकारलें आहे.

---

## बंगालमधील जमीनदारी पद्धत बंद करणार ?

बंगाल सरकारनें दोन वर्षांपूर्वी सर फ्रॅन्सिस फ्लाउड ह्यांचे अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमून, त्याचेकडे बंगालमधील जमीन महसुलाच्या पद्धतीसंबंधाची चौकशी करण्याचें काम सोंपविलें होतें. त्या पद्धतींत कोणत्या सुधारणा करणें आवश्यक आहे आणि त्या कोणत्या रीतीनें कराव्यात, हेंहि कमिशननें सुचवावयाचें होतें. हिंदुस्थानांतील विविध प्रकारच्या महसूल पद्धतीचें निरीक्षण करून, बंगालमधील जमीनदारी पद्धती बंद करावी असा अभिप्राय आपल्या रिपोर्टांत व्यक्त केला आहे. सरकार आणि जमीन कसणारे शेतकरी ह्यांचेमधील मध्यस्तांचे हितसंबंध

सरकारनें विकत घ्यावें, अशी कमिशनची शिफारस आहे. ही शिफारस अंमलांत येण्यास वेळ लागेल, तोंपर्यंत शेतीच्या उत्पन्नावर कर बसवावा, अशी कमिशनची सूचना आहे. सरकारनें जमीन आपणांकडे घेतेवेळीं जमीनदारास किंमत किती द्यावी, ह्याबाबत कमिशनच्या सभासदांत ऐकमत्य नाहीं. १७९३ सालीं जमीनदारीच्या पद्धतीस बंगालमध्यें प्रारंभ झाला, त्या वेळच्या किंमतीचे दहा पट रकम रास्त होईल असें शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचें म्हणणें आहे. ह्या उलट, नुकसानभरपाईची रकम जमिनीच्या आजच्या किंमतीचे सोळापट असावी असें जमीनदारांच्या प्रतिनिधींचें म्हणणें आहे. कमिशनचा रिपोर्ट बंगाल सरकारनें मान्य केला तरी ब्रिटिश पार्लमेंटानें त्यास मान्यता दिल्याखेरीज त्याची अंमलबजावणी होऊं शकणार नाहीं.

### जमीन गहाणाच्या बँकांची परिस्थिति

आमच्या ह्या प्रांतांत जिल्ह्यांमध्यें प्राथमिक जमीन गहाणाच्या बँका आणि त्यांची प्रांतिक मध्यवर्ती बँक ह्या संस्थांचें कार्य आज चार-पांच वर्षें चालू आहे. लांब मुदतीनें सरकारची हमी असलेलीं डिबेंचर्स विकून भांडवल उभारावयाचें आणि तें प्राथमिक बँकांस पुरवावयाचें हा मध्यवर्ती सहकारी जमीन गहाणाच्या बँकेचा उद्देश आहे. प्रारंभीं डिबेंचर्स विकून उभारलेलें ह्या बँकेचें भांडवल संपून तिला आतां पैशाची टंचाई पडली आहे. पैशाच्या अभावीं प्राथमिक बँकांचें काम चालण्याचे मार्गांत मोठा अडथळा उत्पन्न झाला आहे. प्रांतिक बँकेच्या एका शिष्टमंडळानें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्यापुढें ही अडचण मांडली आहे आणि ती तात्पुरती दूर होण्याविषयींचें आश्वासन सरकारकडून मिळालें आहे असें समजतें. भांडवलाचा व डिबेंचर्सचा हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे हें जाणून प्रांतिक बँकेनें त्याचा पिच्छा पुरवून समाधानकारक निकाल लावून घेतला पाहिजे. प्रांतिक कायदेमंडळानें पन्नास लक्ष रुपयांच्या मर्यादेपर्यंत सरकारनें हमी घेण्यास मान्यता दिलेली आहे, तिची अंमलबजावणी होणें अगत्याचें आहे. युद्धामुळें व्याजाचे दर चढून डिबेंचर्सच्या विक्रीस प्रतिकूल अशी परिस्थिति उत्पन्न केली असली तरी तिच्या मधून मार्ग काढण्याचें काम सरकारचें व प्रांतिक बँकेचें आहे. शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा आतां अंमलांत यावयाचा आहे, त्याचे दृष्टीनेंहि प्रस्तुत विषयाचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

### रशियाचा तटस्थपणा

"आपण आपली तटस्थपणाची भूमिका कायम राखली पाहिजे." असें रशियाच्या परराष्ट्रीय खात्याचे प्रमुख, एम. मोलोटॉव्ह, हे आपल्या एका भाषणांत म्हणाले. रशिया आणि जर्मनी ह्यांचेमधील तहाचा उल्लेख करून, फ्रान्सनें रशियाविरुद्ध कांहीं गोष्टी केल्यामुळें त्यांचेमधील संबंध बिघडले आहेत, असेंहि ते म्हणाले.

### ७९ लक्ष रुपयांचें नवीन कर्ज

रस्ते चांगले तयार करणें, ड्रेनेज लाइन टाकणें, इत्यादींसाठीं लागणारे ७९ लक्ष रुपये अहमदाबादची म्युनिसिपॅलिटी कर्जरूपानें उभारणार आहे.


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

(स्थापना : मे १९१६) रु.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. | ...... | १०,००,०००।- |
| जमा झालेलें शेअर भांडवल | ....... | ४,६९,०००।- |
| रिझर्व्ह फंड. | ...... | २,९८,०००।- |
| इतर फंडस्. | ...... | ३,७७,०००।- |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) | ...... | ५७,८९,०००।- |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवींवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

वी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. चे पै ची तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ प्री. धी. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

रिझर्व्ह बँकेचें मुख्य काम शेतीच्या धंदास भांडवल पुरवणें हें आहे असें कित्येकांस वाटतें. शेतीच्या धंदास पैसे देण्यासाठींच रिझर्व्ह बँकेची स्थापना झालेली आहे, असाहि कित्येकांचा समज आहे. बँकेंतील ॲग्रिकल्चरल क्रेडिट ह्या स्वतंत्र खात्यामुळें हा समज अधिक दृढ झाला आहे. वास्तविक पहातां, शेतीचा धंदास भांडवलाचा पुरवठा आणि रिझर्व्ह बँक ह्यांचा निकटचा संबंध नाहीं. हिंदुस्थानांतच तो का जोडला जातो, ह्याविषयीं आश्चर्य वाटण्याजोगें आहे. मध्यवर्ती बँकेचें मुख्य कार्य चलन आणि पत ह्यांच्या नियंत्रणाचें असतें. देशांतील बँका उद्योगधंद्यांस व व्यापारास भांडवल पुरवितात आणि विशेष प्रसंगीं जादा पैशाची आवश्यकता भासते त्यावेळीं मध्यवर्ती बँक त्यांच्या सहायास येते. हें सहाय तिला प्रभावी रीतीनें देतां यावें ह्यासाठी व्यापारी बँकांस तिचेकडे आपल्या ठेवींच्या कांहीं विशिष्ट प्रमाणांत रकम शिल्लक राखावी लागते. ही रकम नेहेमी तरती राहील अशी खबरदारी रिझर्व्ह बँकेस घ्यावी लागते. म्हणजे, अडीअडचणींचे वेळीं ती उपयोगी पडूं शकते. सहाजिकच, शेतीचे धंदास पैसे देण्याचे वेळीं अवलंबिण्याचें धोरण आणि इतर व्यापारी व्यवसायांस पैसे देण्याचें धोरण ह्यांत बँकेस फरक करतां येत नाहीं. शेतीचा धंदा हा हिंदुस्थानांतील प्रमुख धंदा आहे. त्यास भांडवलाचा पुरवठा करण्याचें काम अत्यंत बिकट असतें, आणि विशेषतः हिंदुस्थानांत तर तें फारच अवघड आहे. हें काम मुख्यतः सावकार करतात. परंतु त्यांच्या कचाट्यांतून शेतकऱ्यांस सोडविण्यासाठी सहकारी पतपेढ्या काढल्या आहेत, त्या फारशा यशस्वी झालेल्या नाहींत. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या वेळेस, ती शेतकऱ्यांस कशी उपयोगी पडूं शकेल, ह्याविषयीं चर्चा होणें स्वाभाविक होतें. आणि त्यास अनुसरून रिझर्व्ह बँक ॲक्टांत कांहीं तरतूद करण्यांत आलेली आहे. शेतीच्या धंद्यास बँकेनें भांडवलाचा करावयाचा पुरवठा, ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंटची स्थापना आणि शेतीच्या धंदास होणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्याबाबत बँकेनें करावयाचा रिपोर्ट ह्या तीन मुद्यांत ती तरतूद समाविष्ट आहे. श्री. के. जी. अंबेगांवकर, ह्यांचा प्रस्तुत विषयावर "बाँबे को-ऑपरेटिव्ह कॉर्टर्ली"च्या ताज्या अंकांत एक माहितीपूर्ण लेख प्रसिद्ध झाला आहे, त्याचा अनुवाद येथें करण्यांत येत आहे.

### बँक हुंड्या रीडिस्कौंट केव्हां करील ?

रिझर्व बँकेनें प्रत्यक्ष शेतकऱ्यांस भांडवल द्यावें असा कायदा सांगत नाहीं. ह्या संबंधांतील योजना इतर म्हणजे व्यापारी भांडवलाच्या पुरवठ्याच्या योजनेस धरूनच आहे. परंतु, शेतीच्या मोसमी व्यवहारासाठी अगर पिकांच्या उठावासाठी हुंड्या काढलेल्या असतील, तर त्या ९ महिने मुदतीच्या असल्या तरी रिझर्व्ह त्या रीडिस्कौंट करील. ३ महिन्यांपेक्षा अधिक मुदतीच्या शेतीच्या हुंड्या रीडिस्कौंट करण्यांत शेतीच्या धंदास सहाय करणें हा हेतु आहे. ह्या हुंड्या रीडिस्कौंट करण्यासाठी पाठविण्याचा प्रांतिक सहकारी बँकांसहि अधिकार आहे.

हुंड्या आणि वचनचिठ्या ह्यांची खरेदी-विक्री अगर त्या रीडिस्कौंट होण्यापूर्वी त्यांना खालील अटी पार पाडाव्या लागतात:—

( १ ) त्या हिंदुस्थानांत अगर ब्रह्मदेशांत काढलेल्या असून त्यांचे पैसे हिंदुस्थानांत अगर ब्रह्मदेशांत द्यावयाचे आहेत.

( २ ) त्यावरील किमान दोन चांगल्या सह्यांपैकीं एक शेड्यूल्ड बँकेची अगर प्रांतिक सहकारी बँकेची आहे.

( ३ ) त्या शेतीच्या मोसमी व्यवहारासाठी अगर पिकांच्या उठावासाठी काढलेल्या आहेत.

( ४ ) रिझर्व्ह बँकेनें विकत घेतल्यापासून अगर रीडिस्कौंट केल्यापासून त्यांची मुदत ९ महिन्यांचे आंत संपते.

वरील अटींपैकी तिसऱ्या अटीवरून, कोणत्या प्रकारच्या शेतीचे व्यवहारास रिझर्व्ह बँक मदत करूं शकते हें स्पष्ट होतें. दीर्घ मुदतींची कर्जे अगर शेतीच्या धंदाशी प्रत्यक्ष संबंध नसलेलीं कर्जे रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत येत नाहींत. हुंडींत नमूद केलेल्या वेळेमध्यें व्यवहार पुरा होऊन कर्जदाराचे हातीं पैसे येतील आणि त्यांतून तो परतफेड करूं शकेल अशी परिस्थिति असेल तरच त्या व्यवहारास रिझर्व्ह बँकेचें सहाय मिळूं शकेल. शेतीच्या मालावर आधारलेल्या हुंड्यांची खरेदी-विक्री बाजारांत होण्यास रिझर्व्ह बँकेनें दिलेल्या सवलतीचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे. व्यापारी हुंड्यांप्रमाणें त्या हुंड्या हातोहात फिरावयाच्या असतील तर व्यापारी हुंड्यांप्रमाणेंच त्यांचें स्वरूप असलें पाहिजे.

### कर्जांचें तारण व अटी

शेड्यूल्ड बँका आणि प्रांतिक सहकारी बँका ह्यांना, कांहीं विशिष्ट अटींवर मागणी करतांक्षणीच परत करावयाचीं अगर ९० दिवसांचे आंत परंतु ठराविक मुदतीनें परत करावयाचीं कर्जें देण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस आहे. ह्या कर्जांस खालील प्रकारचें तारण पाहिजे:—

( १ ) ट्रस्टी सिक्युरिटीज. म्हणजे, ज्या रोख्यांत पैसे गुंतविण्यास ट्रस्टीजना परवानगी आहे, अशा प्रकारचे रोखे.

( २ ) सोनें, चांदी, अगर त्यांवर मालकी दर्शविणारे कागदपत्र.

( ३ ) बँकेनें विकत घेतां येण्याजोगी अगर रीडिस्कौंट करतां येण्याजोग्या हुंड्या व वचनचिठ्या.

( ४ ) शेड्यूल्ड बँक अगर प्रांतिक सहकारी बँक ह्यांची वचनचिठ्ठी. ह्या बँकांकडून शेतीच्या मोसमी कामासाठी अगर पिकांच्या उठावासाठी घेण्यांत आलेल्या कॅशक्रेडिटला अगर ओव्हरड्राफ्टला तारण म्हणून त्यांस दिलेल्या मालाचें मालकीपत्र ह्या वचनचिठ्ठीस जोडलें पाहिजे.

ह्या शेवटच्या प्रकारच्या तारणाचा अर्थ स्पष्ट नाहीं. प्रत्यक्ष बँकांकडेच माल गहाण ठेवला असला, तर ही अट पाळल्यासारखी होते, असें एक मत आहे. ह्या उलट, मालावरील मालकीपत्र बँकांकडे तारण ठेवलेलें असलें पाहिजे, माल नव्हे, असें रिझर्व्ह बँकेचें म्हणणें आहे. मालच बँकांचे ताब्यांत दिला असेल तर त्यासंबंधांतील वरील प्रकारचे कागद बँकांसच कसे करतां येणार ? कोठाराचा व्यवहार करणाऱ्या स्वतंत्र कंपन्यांची हिंदुस्थानांत स्थापना झाल्याविना, अशा प्रकारचा व्यवहार रिझर्व्ह बँकेच्या कार्यक्षेत्रांत बसूं शकणार नाहीं.

रिझर्व्ह बँक ही बँकांची बँक आहे, ती व्यक्तींस कर्जें देत नाहीं. तसेंच, हीं कर्जें अल्पकालिक असतात. शेती आणि व्यापार ह्यांस पुरेसा पैसा उपलब्ध राहील ह्या दृष्टीनें चलन आणि पत ह्यांचें नियमन करणें हें रिझर्व्ह बँकेचें मुख्य काम होय. शेतीच्या धंदास कर्जें देण्याच्या मार्गांतील खरी अडचण ह्या कर्जांची परतफेड वक्शीर होत नाहीं, ही होय. मंदीच्या काळांत कमी व्याजानें पैसे मिळण्याजोगे असतांहि आणि

( पान १६५ पहा )

(या प्रॉस्पेक्टसची मूळ इंग्रजी प्रत मे. रजिस्ट्रार ऑफ कम्पनीज् मुंबई ह्यांच्याकडे नोंदविण्यांत आली आहे.)

खालील मजकूर हा मूळ इंग्रजी प्रॉस्पेक्टसचा मराठी गोषवारा होय.

प्रॉस्पेक्टस्

# धी लाइट अॅण्ड पॉवर सप्लायर्स, लि.

**अधिकृत भांडवल : रुपये १०,००,०००**

प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें ५ टक्क्यांचे १०,००० प्रेफरन्स शेअर्स
प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें १०,००० ऑर्डिनरी शेअर्स.

**विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. २,५०,०००**

प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें ५,००० ऑर्डिनरी व / अगर प्रेफरन्स शेअर्स

प्रेफरन्स व ऑर्डिनरी या दोन्ही शेअरसंच्या रकमा खालीलप्रमाणें भरावयाच्या आहेत—
(१) अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५ प्रमाणें
(२) अर्ज-मंजुरीनंतर प्रत्येक शेअरला रु. १५ आणि
(३) उरलेले रु. २० कंपनीकडून प्रत्येकीं रु. १० प्रमाणें कमींत कमी ३ महिन्यांच्या अंतरानें दोनदा मागणी आल्यानंतर भरावयाचे आहेत.

**डायरेक्टर्स (संचालक-मंडळ)**

१ श्री. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., अॅक्चुअरी (अध्यक्ष)... पुणें ४
२ दि. ब. व्ही. जी. शेटये, एम. आय. ई. (इंडिया); एम. आर. सॅए, आय. रिटा. कन्सल्टिंग पब्लिक हेल्थ इंजिनिअर, गव्हर्मेंट ऑफ बाँबे,... पुणें.
३ श्री. एच. व्ही. तुळपुळे, बी. ए., एलएल. बी., डायरेक्टर कॉमनवेल्थ अॅशु. कं. लि. ... ... ... पुणें ४
४ श्री. व्ही. एच. देशमुख, बी. ए. मॅनेजिंग एजंट, ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशु कं. लि. ... ... ... पुणें ४
५ श्री. के. जी. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. वकील ... सांगली
६ श्री. पी. जी. मराठे, एक्स-मॅनेजर, दी जनरल अॅशु. सोसायटी लि. (अजमेर) ... ... ... पुणें ४
७ श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ अॅशु. कं. लि. चेअरमन, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि, आणि होलियम प्रॉडक्टस (इंडिया) लि. डायरेक्टर, बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., महाराष्ट्र इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट्स लि., हंस पिक्चर्स लि, इत्यादि (एक्स-ऑफिशिओ) ... ... पुणें २
८ श्री. कृष्णाजी व्ही. साने, बी. ई., इंजिनियर अँड कॉन्ट्रॅक्टर, डायरेक्टर, दी अर्बन को. ऑ. बँक लि., (एक्स-ऑफिशिओ) ... सांगली
९ श्री. केशव व्ही. साने, फर्स्ट क्लास मेकॅनिकल इंजिनियर, डायरेक्टर, दी हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इन्शु. सोसा. लि. (एक्स-ऑफिशिओ)... पुणें २

**कायद्याचे सल्लागार**

१ रा. एच. व्ही. तुळपुळे, बी. ए., एलएल. बी., पुणें २.
२ रा. व्ही. एन. निसोरे, एम. ए., एलएल. बी., पुणें २.

**सॉलिसिटर्स**

मे. दिवेकर अॅण्ड को., १४ हमाम स्ट्रीट, कोट मुंबई.

**ऑडिटर्स**

१ श्री. जी. डी. आपटे, बी. ए., जी. डी. ए, आर. ए., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.
२ मे. डी. सी. अभ्यंकर आणि कंपनी १२ पुस्तक बिल्डिंग, कोट, मुंबई.

**बँकर्स**

१ दी न्यू सिटिझन्स बँक ऑफ इंडिया लिमिटेड, मुंबई.
२ दी बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें २.
३ दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें २.

**मॅनेजिंग एजन्टस्**

दी इंडस्ट्रियल सर्व्हिस लिमिटेड, पुणें २.

**रजिस्टर्ड ऑफिस**

कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.

उद्देश—हिंदुस्थानांत विजेचा धंदा बाल्यावस्थेंत असून तो वाढीस लागण्यास पुष्कळ वाव आहे. इंग्लंड, अमेरिका यासारख्या सुधारलेल्या देशांत विजेच्या साह्यानें मनुष्यमात्रास अनेक सुखसोयी उपलब्ध झाल्या आहेत. या देशांत दहा हजारांहून कमी लोकसंख्या असलेल्या अशा लहानसहान गांवांतूनहि विजेच्या साहाय्यानें अनेक सुखसोयी उपलब्ध असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. मनुष्यमात्राच्या दैनंदिन व्यवहारांत विजेचा नानाप्रकारें उपयोग करून घेतां येतो ही गोष्ट आतां निर्विवाद आहे.

परंतु दुर्दैवानें हिंदुस्थानांत अशी परिस्थिति आढळत नाहीं. विजेचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका करून घेतला पाहिजे. या कारणासाठीं विद्युदुत्पादनाच्या योजनेला लोकांकडून पाठिंबा मिळेल अशी सबळ आशा आहे. देशांत विद्युदुत्पादनाचे कारखाने जितके अधिकाधिक निघतील तितकें राष्ट्राचें उद्योगधंद्यांचे बाबतींत पुढें पाऊल पडत राहील.

तेलापासून निर्माण होणाऱ्या शक्तीपेक्षां विजेपासून निर्माण होणाऱ्या शक्तीचे अनेक फायदे आहेत. त्यांतील महत्त्वाचा फायदा म्हणजे तेलापेक्षां विजेच्या शक्तीला फारच अल्प खर्च येतो. या कारणासाठीं खेडेगांवांतून विजेचा प्रसार झाल्यास लहानसहान उद्योगधंद्यांना फारच मदत होण्यासारखी आहे. देशांतील उद्योगधंद्यांच्या साहाय्यार्थ ज्या ज्या ठिकाणीं विजेचा उपयोग होईल अशा ठिकाणीं स्वस्त किंमतींत वीज पुरविण्याच्या हेतूनें विद्युदुत्पादनाचे कारखाने काढण्यासाठीं ही कंपनी स्थापन करण्यांत आली आहे.

या कंपनीचे एक प्रवर्तक श्री. केशव व्यंकटेश साने यांना ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी व पालघर आणि अकोला जिल्ह्यांतील [illegible] या ठिकाणीं विजेचा पुरवठा करण्याचे परवाने मुंबई सरकारकडून मिळविले आहेत. मॅनेजिंग एजंट्स यांनी मध्यप्रांताच्या सरकारकडून मूर्तिजापूर येथें विजेचा पुरवठा करण्यासाठीं संमति मिळविली असून त्याचा परवाना लवकरच हातीं येईल अशी अपेक्षा आहे.

वरील योजना फलद्रूप होण्यास तीन वर्षे लागतील, तथापि वरील गांवांतील म्युनिसिपल संस्था व मूर्तिजापूर व पालघर येथील रेल्वे अधिकाऱ्यांनी या कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर वीज घेण्याचें आश्वासन दिलें आहे.

सांप्रत उद्योगधंद्यांची परिस्थिति बिकट आहे. तथापि अशा परिस्थितींतहि कंपनीला आपल्या शेअरवर ६ टक्के—किंबहुना अधिकहि डिव्हिडंड देतां येईल असा विश्वास आहे.

**सुरक्षितता**— सार्वजनिक उपयुक्ततेच्या योजनेसाठीं ही कंपनी काढली असल्यामुळें व अशा कंपनीला सरकारकडून ३० वर्षांचा मक्ता असल्यामुळें यांत भांडवल केवळ सुरक्षितच नसून त्यावर चांगलें व्याजहि पडेल असा विश्वास आहे.

**कंपनी काढण्याबद्दल मेहनताना**—कंपनीच्या उत्पादकांना मेहनताना असा मिळणार नाहीं.

**प्राथमिक खर्च**—शेअरवरील कमिशन व ब्रोकरेज वगैरे धरून हा खर्च रु. १०,००० पर्यंत होईल असा अंदाज आहे.

**शेअरविक्रीवर कमिशन**—कंपनीच्या शेअरविक्रीवर ५ टक्क्यांहून अधिक कमिशन देण्यांत येणार नाहीं.

**अंडररायटिंग कमिशन**—कंपनीचे कांहीं शेअर 'अंडररायट' केल्यास तशा शेअरवर (प्रेफरन्स अगर ऑर्डिनरी) ५ टक्के कमिशन देण्यांत येईल.

**ब्रोकरेज**—अधिकृत ब्रोकरास प्रत्येक शेअरवर एक रुपयाप्रमाणें ब्रोकरेज देण्यांत येईल.

**डायरेक्टरांची संख्या**—एक्स ऑफिशिओ डायरेक्टर सेरीज डायरेक्टरांची संख्या तीनहून कमी, पण बाराहून अधिक असणार नाहीं.

**डायरेक्टरांची पात्रता**—एक्स ऑफिशिओ डायरेक्टरांखेरीज प्रत्येक डायरेक्टरानें संपूर्ण भरणाई केलेले रु. २५०० चे शेअर घेतले पाहिजेत.

**डायरेक्टरांचा मुशाहिरा**—प्रत्येक सभेस हजर असणाऱ्या डायरेक्टरास डायरेक्टर्स बोर्डानें ठरवितील त्याप्रमाणें रु. ५० पर्यंत मुशाहिरा देण्यात येईल. तसेच सभेस हजर राहण्यासाठीं डायरेक्टरास परगांवाहून येणें असल्यास योग्य तो प्रवासभत्ता देण्यात येईल.

**डायरेक्टरांचे हितसंबंध**– श्री. एच. व्ही. तुळपुळे हे कंपनीचे कायद्याचे सल्लागार असून कंपनीचे तीन एक्स-ऑफिशिओ डायरेक्टर्स हे इंडस्ट्रियल सर्व्हिस लि. यांचे डायरेक्टर्स आहेत व ते या कंपनीचे उत्पादक व मॅनेजिंग एजंटस् आहेत. वरील लोकांचे कंपनीशीं त्या त्या नात्यानें हितसंबंध निगडित आहेत.

**याखेरीज**

**व्यवस्था**––डायरेक्टरबोर्डाच्या देखरेखीखाली व नियंत्रणाप्रमाणें मॅनेजिंग एजंटस् कंपनीचा कारभार पाहतील.

**मॅनेजिंग एजंटस्**—इंडियन कंपनीज ॲक्टान्वयें नोंदलेली दी इंडस्ट्रिअल सर्व्हिस लि. ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांना कंपनी नोंदल्यापासून वीस वर्षेपर्यंत मॅनेजिंग एजंट्स म्हणून नेमण्यांत आलें असून त्यांना खालीलप्रमाणें मुशाहिरा मिळावयाचा आहे.

(१) कंपनी नोंदल्यापासून दरमहा रुपये १०० ऑफिस अलाउन्स. तथापि १८ महिन्यांत कामास प्रारंभ न झाल्यास ऑफिस अलाउन्स देण्यांत येणार नाहीं.

(२) वरील ऑफिस अलाउन्सखेरीज बांधकामाच्या मुदतींत प्रत्येक पॉवर हाउसमार्गे तपासणीसाठीं ऐनजिनसी रु. ४०० चा अलाउन्स.

(३) वरील ऑफिस अलाउन्सखेरीज वीजपुरवठ्याचें काम चालू झाल्यावर पालघर येथील कारखान्यासाठी रु. ५०, अथणी येथील कारखान्यासाठी रु. ७५ व मूर्तिजापूर यथील कारखान्यासाठीं रु. ७५ याप्रमाणें दरमहा अलाउन्स देण्यांत येईल. वरील तीनहि कारखान्यांसाठीं कोणत्याहि परिस्थितींत रु.२००हून अधिक ऑफिस अलाउन्स देण्यांत येणार नाहीं.

(४) वर तिसऱ्या कलमांत लिहिलेल्या ऑफिस अलाउन्सखेरीज कंपनीनें प्रेफरन्स शेअर्सवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअर्सवर ३ टक्के डिव्हिडंड दिल्यास मॅनेजिंग एजंटांस कंपनीच्या नक्की नफ्यापैकीं १० टक्के कमिशन मिळेल. अगर

(५) वर तिसऱ्या कलमांत लिहिलेल्या ऑफिस अलाउन्सखेरीज कंपनीनें प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के डिव्हिडंड दिल्यास मॅनेजिंग एजंटांस कंपनीच्या नक्की नफ्यापैकीं १२॥ टक्के कमिशन मिळेल. अगर

(६) वरील तिसऱ्या कलमांत लिहिलेल्या ऑफिस अलाउन्सखेरीज कंपनीनें प्रेफरन्स व ऑर्डिनरी शेअरवर ५ टक्के डिव्हिडंड दिल्यास मॅनेजिंग एजंटांस नक्की नफ्यापैकीं १५ कमिशन मिळेल. अगर

(७) वर तिसऱ्या कलमांत लिहिलेल्या ऑफिस अलाउन्सखेरीज कंपनीनें प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअरवर ६ टक्के डिव्हिडंड दिल्यास मॅनेजिंग एजंटांस नक्की नफ्यापैकीं २० टक्के कमिशन मिळेल.

मॅनेजिंग एजंटांस द्यावयाच्या ऑफिस अलाउन्समध्यें ऑफिस खर्च, कंपनीचा कारभार चालविण्यासाठीं होणारा खर्च व मॅनेजिंग एजंटांस द्यावयाचा प्रवासखर्च यांचा समावेश होत नाहीं.

पालघर, अथणी व मूर्तिजापूर येथील कारखान्यांच्या योजनेबाबत मॅनेजिंग एजंटांस ऑफिस अलाउन्स व कमिशन मिळून दरवर्षी रु. ७५०० हून अधिक रक्कम मिळणार नाहीं. तथापि नवीन ठिकाणीं कारखाने सुरू केल्यास अगर वरील तीन ठिकाणच्या कारखान्यांची सांप्रतच्या योजनेहून अधिक वाढ झाल्यास मॅनेजिंग एजंटांस रु.७५०० हून अधिक मुशाहिरा मिळूं शकेल.

**मताधिकार**–प्रत्येक ऑर्डिनरी अगर प्रेफरन्स शेअर-होल्डरास एक मत देण्याचा अधिकार आहे.

**शेअरसाठीं अर्ज**–कंपनीच्या ठराविक फॉर्मवर शेअरसाठीं अर्ज करावेत. असे फॉर्म कंपनीच्या कचेरींत अगर कंपनीच्या बँकर्सकडे मिळतील.

मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन व मॅनेजिंग एजंटांशीं झालेले करारमदार यांचे कागदपत्र कंपनीच्या कचेरींत पाहण्यास मिळतील.

मेमोरॅण्डम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन एक रुपयास कंपनीच्या कचेरींत मिळेल.

डायरेक्टर्स :—

ता. १-२-४०.

जी. एस. मराठे,
व्ही. जी. शेट्ये,
एच. व्ही. तुळपुळे,
व्ही. एच. देशमुख,
पी. जी. मराठे,
आर. एन. अभ्यंकर,
के. जी. अभ्यंकर,
के. व्ही. साने,
के. व्ही. साने.

**खुलासा** :- आर्टिकल्समध्यें नमूद केल्याप्रमाणें प्रथम फक्त पालघरचेंच काम हातीं घेण्यांत येईल.

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

( पृष्ठ १६३ वरून चालू )

मध्यवर्ती जिल्हा बँकांकडे पैसे पडून असतांनाहि शेतकऱ्यांस त्याचा उपयोग होऊं शकला नाहीं, कारण त्यांनीं आधीं घेतलेलीं कर्जें ते फेडण्यास असमर्थ होऊन त्यांस नवीन कर्जें देणें धोक्याचें झालें. बँकांजवळील पैसाहि शेतकऱ्यांकडे गुंतून राहिला. पैशाचा मुबलक पुरवठा, परंतु योग्य व्याजानें तो शेतकऱ्यांस मिळविण्याची अडचण ह्या दोन्ही गोष्टींचें एकाच वेळीं अस्तित्व हें हिंदुस्थानांतील परिस्थितीचें कायमचें एक वैशिष्ट्य होऊन राहिलें आहे. केवळ कर्जें देणाऱ्या संस्थांची संख्या वाढवून तो प्रश्न सुटणार नाहीं. खरी गरज शेतकऱ्यांच्या परिस्थितींत सुधारणा होण्याची आणि शेतकरी आणि कर्ज देणाऱ्या संस्था ह्यांमधील संबंधांत बदल घडून येण्याची आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँक कायद्यांत ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याची आणि शेतीच्या धंद्यास होणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्याबाबत रिपोर्टांची तरतूद करण्यांत आलेली आहे.

### रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपासून तीन वर्षांचे आंत तिनें सावकारांचे व्यवहार तिच्या व्यवहाराशीं कसे संलग्न करतां येतील आणि शेतीस भांडवलाचा पुरवठा अधिक चांगल्या तऱ्हेनें कसा करतां येईल, ह्याविषयीं रिपोर्ट करावयाचा होता. रिझर्व्ह बँकेनें प्रथम एक प्रास्ताविक आणि नंतर १९३७ अखेर अखेरचा रिपोर्ट तयार केला. शेतकऱ्यांची पत वाढण्याची आणि भांडवल पुरविणाऱ्या प्राथमिक संस्थेनें शेतकऱ्याची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याची आवश्यकता रिपोर्टांत नमूद करण्यांत आली. सहकारी सोसायट्यांमार्फत हें काम चांगल्या तऱ्हेनें करवून घेतां येणें शक्य आहे. प्रस्तुत रिपोर्टांतील सूचनेस अनुसरून सुधारणा घडवून आणण्याचें कार्य चालू आहे.

रिझर्व्ह बँकेस सावकारांशीं निकटचा संबंध जोडतां आला नाहीं ह्याचें कारण ते आपला व्यापारविषयक व्यवसाय निराळा काढण्यास तयार नाहींत आणि नियमित ताळेबंद प्रसिद्ध करण्याची त्यांची तयारी नाहीं. हे सावकार स्वतःच्या भांडवलानें व्यवहार करतात आणि शेतीस भांडवल पुरविण्यांत त्यांचा फार मोठा हात आहे. परंतु ह्यांचा पैशाचे बाजाराशीं संबंध येत नाहीं आणि ते बँकिंगचे क्षेत्राचे बाहेर रहातात. ह्यांचे व्यवहार नियंत्रित करण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें कित्येक सूचना केल्या आहेत आणि त्यांस अनुसरून कांहीं प्रांतांनीं कायदेहि केले आहेत. त्यांनीं शेतकऱ्यांस पिकांचे उठावासाठीं बँकांकडून कादून पैसे दिले तर त्यांच्या हुंड्या खास स्वस्त दरानें रीडिस्कौंट कराव्या, असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे.

### ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट

ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट ह्या नांवामुळें बराच गैरसमज होतो. शेतकऱ्यांस कर्जें देण्यासाठीं हें खातें आहे अशी गैर समजूत होते. तथापि, त्या खात्याकडे सोपविलेलीं कामें त्यानें नीट पार पाडलीं, तर शेतीच्या धंद्यास भांडवल मिळणें सोपें जाईल, ह्यांत संशय नाहीं. ह्या खात्यानें अनेक तज्ज्ञ अधिकारी नेमले आहेत आणि कित्येक प्रश्नांवर बुलेटिन्स प्रसिद्ध केलीं आहेत. जमीन गहाणाच्या बँका, कर्ज निवारण, सावकारीचें नियंत्रण, इत्यादि प्रश्नांचा विचार हें खातें करीत आहे. हें खातें करीत असलेलें काम लोकांच्या नजरेसमोर नसलें तरी तें कमी महत्त्वाचें नाहीं. शेतीस करावयाच्या भांडवलाच्या पुरवठ्याबाबत सतत विचार करणारी ती एक महत्त्वाची संस्था आहे. हें संशोधनाचें काम रोजच्या कारभारांत दंग असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांस शक्य होत नाहीं. अभ्यास आणि सल्लामसलत ह्यापलीकडे ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें विशेष कांहीं केलें नाहीं तरी हिंदी शेतकऱ्यांच्या हितसंवर्धनास तें उत्कृष्ट रीतीनें हातभार लावूं शकेल.

### अमेरिकेचें युद्धविषयक धोरण

"(अमेरिकेनें सध्याच्या युद्धासंबंधीं स्वीकारलेल्या धोरणाविषयीं ग्रेट ब्रिटनमध्यें लोकमत काय आहे, ह्याचा मासला खालीं उद्धृत केलेल्या लेखांत आढळेल. एका ब्रिटिश साप्ताहिकाच्या अगदी ताज्या अंकांतून हा मजकूर घेण्यांत आला आहे.)

दोस्त राष्ट्रांनीं युद्ध जिंकावें, असेंच बहुसंख्य अमेरिकन लोकांना वाटतें, आणि त्या राष्ट्रास मदत करण्यासाठी स्वार्थत्यागाचीही त्यांची तयारी आहे. परंतु कांहीं अमेरिकन बँकर्स आणि कारखानदार ह्यांचा असा एक वर्ग आहे कीं त्यांची युद्धाकडे पहाण्याची दृष्टि पूर्णपणें स्वार्थी आहे. त्या कारणानें, युद्धापासून आपला फायदा काय होतो, ह्या एकाच बुद्धीनें ते प्रेरित होतात. रशियानें गरीब बिचाऱ्या फिनलंडवर चाल केली, परंतु अमेरिकेनें त्या बाबत काय केलें? शेकडा ९८ अमेरिकनांस फिनलंडबद्दल हळहळ वाटते, परंतु त्याबरोबरच अमेरिका रशियास युद्धसामुग्री पुरवितो. हा पुरवठा वाढत्या प्रमाणावर होत आहे. फिनलंडला मदत करण्याचें सोडून उलट तो फिनलंडच्या नाशास कारणीभूत होत आहे. फिनलंडला त्यामुळें रशियन फौजा आणि अमेरिकन शस्त्रास्त्रें ह्यांचेशीं टक्कर द्यावी लागली. अमेरिकेनें फिनलंडला कर्ज दिलें, परंतु त्याचा विनियोग युद्धाकडे करतां कामा नये अशी अट घातली!

जपाननें चीनमध्यें चढाई चालविली आहे. अमेरिका त्या संबंधांत काय करीत आहे? जपानच्या युद्धसामुग्रीपैकी ५४% सामुग्री अमेरिकन होती. १९३८ सालीं हें प्रमाण ५६% झालें आणि आतां तें अधिकच वाढलें आहे. जपानच्या लोखंडाच्या तुकड्यांचे खरेदीपैकी ९०% खरेदी आणि विमानांस लागणाऱ्या पेट्रोलच्या खरेदीपैकी ९०% खरेदी अमेरिकेंत होते. जर्मनीविरुद्ध सध्या जो लढा चालू आहे, त्याचें मूळ मिसेस चार्लस लिंडबर्ग ह्यांच्या खालील शब्दांत आढळतें:—"युरोपास आपण जागतिक शांतता आणि सामुदायिक संरक्षण ह्यांची आशा दाखविली, आणि त्यांतून मार्ग काढण्यास मात्र मदत केली नाहीं." चालू युद्धाचें दुसरें कारण अमेरिकेचें युद्धविषयक कर्जाचे बाबतींतील धोरण, हें होय. महायुद्धांतून नफा मिळविण्याचा अमेरिकेचा विचार नव्हता, परंतु त्यानें कर्जफेडीची निकड लावली. दोन चार वर्षांचे अवधींत ग्रेट ब्रिटनला अमेरिकेस ६ अब्ज रुपये द्यावे लागले. ग्रेट ब्रिटनजवळील सोन्याचा साठा कमी होऊन त्यास सुवर्ण चलनाचा त्याग करावा लागला. मंदीमुळें ग्रेट ब्रिटनला अमेरिकेकडून पूर्वीप्रमाणें माल विकत घेतां येईना आणि अमेरिकेंत आर्थिक अडचण उपस्थित झाली. ग्रेट ब्रिटनला जर्मनीच्या आक्रमणास आळा घालण्यास अवसर मिळाला नाहीं म्हणून शत्रू बळावला. नाहीं तर आजच्या युद्धाचें प्रयोजनच उरलें नसतें. अमेरिकेनें न्यूट्रॅलिटी ॲक्ट रद्द केला तो दोस्त राष्ट्रांस मदत करण्याच्या भावनेनें नव्हे. ग्रेट ब्रिटननें अमेरिकन आगबोटी तपासल्या, त्यांत तक्रार करण्याजोगें काय आहे? १९१७ सालीं अमेरिकेनें तेंच केलें नाहीं काय? अमेरिकन माल तटस्थ राष्ट्रांमार्फत जर्मनीकडे जात आहे असें आढळून आलें आहे. अमेरिकेला युद्धांत पडावयास नको आहे, परंतु तें संपल्यावर शांतता होण्याचे वेळीं मात्र त्यास लुडबुड करून आपलें महत्त्व वाढविण्यास हवें आहे. युरोपांतील देशांनीं एकमेकांशीं सलोख्यानें तह करून परस्पर व्यापार वाढविणें अमेरिकेस नको आहे. अमेरिकेस आपला परराष्ट्रीय व्यापार वाढवावयाचा आहे. मि. सम्नर वेल्स ह्यांच्या युरोपाकडील सफरीचें रहस्य तरी हेंच आहे. अमेरिकेचा शांतता प्रस्थापित करण्यांतील हेतु उघड आहे; कारण त्याबाबत उदास धोरण ठेवल्यासेरीज आयत्या वेळीं फायद्यांत मोठा हिस्सा कसा मिळणार?"

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५ |
|---|---|---|

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. म. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ९९२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% कम्माफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—० |
| ५% ( १९४०–४३ ) लोन | १०१–१० |
| ४% १९४३ | १०६—२ |
| ३½% बिनमुदत | ९५—१ |
| ३½% १९४७–५० | १०४—६ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९३–१० |
| २¾% १९४८–५२ | ९७—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३८—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | ९९–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३७–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५१५—० |
| पॉर्व मॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०६—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३१—८ |
| कराची ( १०० ) ९% | १९१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३४७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९६२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २१६—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४७–१२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | १९–१३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १४३—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | २०५५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १२०—८ |





एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अशुअरन्स कं. लि.
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its.

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्यांना अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

## विमा–जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा–जगत्, पुणें २.




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे [illegible] तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगां-वर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात होणें, दुखणें, शौचास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. के. १ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.